# विश्व पांथस्थ

अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक VISHWA PANTHASTHA

वर्ष ६ | अंक १ | मार्च २०२३ | मूल्य ₹ १०० | AED 10 | USD 2 | www.panthastha.com




या अंकात – संपादकीय
अधोगती रूपयांची
वा बहुरूप्यांची



डॉ. ज्ञानेश्वर मुळे (I.F.S.) यांची मुलाखत




चिलीतील पांथस्थ – किशन ददलानी



श्रीमंत हिरोजी इंदुलकर सेवा सन्मान पुरस्कार
महाराष्ट्र मंडळ गोवा

REDIO





REDIO विदेशातील भारतीयांना
मदत करणारी संस्था



























**We meet on First Sunday of every month from 8.30 am. to 10.30 am. in Pune, Nashik, Indore**

अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक VISHWA PANTHASTHA

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| संपादकीय | ४ | डॉ.संदीप कडवे |
| डॉ.ज्ञानेश्वर मुळे यांची मुलाखत | ७ | सौ.धनश्री पाटील |
| विदेशातील भारतीयांना मदतीचा हात REDIO | ९ | सौ.धनश्री पाटील |
| चिलीतील पांथस्थ - किशन ददलानी | ११ | प्रविण मानकर |
| क्या आप ठगी के शिकार है | १३ | विश्व पांथस्थ |
| हिरोजी इंदुलकर सेवा सन्मान पुरस्कार | १४ | अनिल पाटील |



विश्व पांथस्थ
वर्ष ६ अंक १
मार्च २०२३

अनिवासी भारतीयांसाठीचे पहिले मराठी मासिक

संपादक
संदीप वसंतराव कडवे

संपादकीय व वितरण साहाय्य
राजन ताबडे, अबू धाबी
धवल नांदेडकर, फुजेरा
वीरभद्र कारेगावकर, अजमान
नितीन गायकवाड, औरंगाबाद

मुखपृष्ठ आणि सजावट
विश्व पांथस्थ

मूल्य ₹ 100 | AED 10 | US$2

Vishwa Panthastha
Year 6 Issue 1
March 2023

First Marathi Monthly For NRIs

Editor
Sandeep Vasantrao Kadwe

Editorial & Distribution Support
Rajan Tawde. Abu Dhabi
Dhawal Nandedkar, Fujerah
Veerbhadra Karegaonkar, Ajman
NitinGaikwad-Aurangbad

Cover & Design
VISHWA PANTHASTHA

Price ₹ 100 | AED 10 | US$2

विश्व पांथस्थ हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक संदीप वसंतराव कडवे यांनी ए-७०३, निसर्ग सिटी -२, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे - ४११०५७. येथे प्रसिध्द केले.
**संपादक - संदीप वसंतराव कडवे**
**(पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी)**

Vishwa Panthastha' monthly publication is owned, printed & published by Sandeep Vasantrao Kadwe. and published at A-703, Nisarg City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune - 411 057.
Mob.: +91 9860678844
e-mail: editor@panthastha.com
website: www.panthastha.com
Editor - Sandeep Vasantrao Kadwe
(Responsible for Selection of News & Articles under the PRB Act.)



या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# संपादकीय



## अधोगती

रूपयाची ?



बहुरूप्यांची ?

भारताची अर्थव्यवस्था, गेली कित्येक शतके तरी, एक्स्पोर्ट ओरिएंटेड कधीच नव्हती आणि नजीकच्या भविष्यात कधीच नसणार आहे. दिल्लीत बसलेले सुडो इकॉनॉमिस्ट म्हणजेच तथाकथित अर्थशास्त्री रुपयाचे अवमूल्यन भारतीय अर्थव्यवस्थेसाठी किती चांगले आहे हे घसा ताणून, लेखणी सरसावून जगभर सांगत आहेत. या सुडो इकॉनॉमिस्टना स्वतःचा खर्च स्वतः करायचा नसतो. सरकारच्या कृपेने घर गाडी नोकर चाकर अधिकार मिळतात. फुकटात आयुष्य जगणारे हे तथाकथित राज्यकर्ते, अर्थशास्त्री, मंत्री अथवा अधिकारी जेव्हा कष्टकरी, मध्यमवर्गीय, जे आता कोरोनानंतर निमन मध्यमवर्गीय झाले आहेत, त्यांना ज्ञान पाजळत फिरतात तेव्हा खरंच वाईट वाटते. रुपया घसरला नाही, डॉलर मजबूत झाला अशी विधाने वाचल्यावर तर हसावे कि रडावे कळत नाही. ज्यांना अर्थव्यवस्थेतील काही कळत नाही, ते मोठेमोठे निर्णय घेत आहेत. हि घसरण रुपयाची आहेच, त्यापेक्षा जास्त बहुरूप्यांची देखील आहे. चीनसारख्या देश देखील आता निर्याताभिमुख धोरणे सोडून प्रचंड देशांतर्गत मागणीसाठी अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करतो आहे. अमेरिकेतील बाँड्स मधील व इतर गुंतवणूक कमी करतो आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे.

दुसरीकडे अनिवासी भारतीय शंभर बिलियन डॉलर प्रत्येक वर्षी भारतात पाठवतात. रुपया घसरला कि आपोआप रुपयातील रक्कम वाढते. एनआरआय चे उखळ प्रथमदर्शनी पांढरे होते पण या एनआरआय रेमिटंसेसची भारतातील पर्चेसिंग पॉवर देखील सतत कमी होत चालली आहे. एनआरआय स्वकर्तृत्वाने मोठे झाले, परंतू त्यांचा राजकीय वापर करून घेतला जातोय असे वाटते. सतत वाढणाऱ्या चलनवाढीमुळे, महागाईमुळे, रुपयाच्या अवमूल्यनामुळे देशातील सर्वसामान्य माणसाचे कंबरडे मोडले आहे.

आयात निर्यातीतील तुटीमुळे रुपया घसरतो असे सर्वसामान्यपणे समजले जाते. मग असे असेल व आपल्याकडे फार काही निर्यातक्षमता नाही हे जगजाहीर आहे तर आयात तरी कमीत कमी करावी हे सामान्य माणसाला देखील कळते. ऑइल ट्रेड डेफिसिट म्हणजे इंधन आयात केल्यामुळे होणारा खर्च हा आयात निर्यात तुटीमधला सर्वात मोठा खर्च. पण आंतरराष्ट्रीय बाजारात ऑइल बॅरल ची किंमत कमी होऊनही देशांतर्गत इंधनांची किंमत सतत का वाढत राहते हे काही न उलगडणारे कोडे आहे. बॅरल च्या किमती कमी झाल्या कि साहजिकच पेट्रोल डिझेल च्या किमती कमी व्हायला हव्या. त्या कमी झाल्या कि महागाई आपसूक कमी होते. कारण देशांतर्गत वाहतुकीचा खर्च वाढला कि महागाई वाढते, पेट्रोल डिझेल चा खर्च कमी झाला कि वाहतुकीचा खर्च कमी होतो, महागाई कमी झाली कि कंझमशन म्हणजे उत्पादनाचा व सेवांचा खप वाढू शकतो, तसे झाले तर देशांतर्गत उत्पादन वाढू शकते, तसे झाले तर रोजगार वाढू शकतो, तसे झाले तर देशांतर्गत उत्पादनक्षमता विकसित होऊन बाकी मालाची आयात कमी होऊ शकते, पुन्हा त्याचा अर्थव्यवस्थेवर सकारात्मक प्रभाव पडून पुन्हा चलनवाढ कमी होऊ शकते, इम्पोर्ट सब्स्टिट्युट प्रॉडक्ट डेव्हलोपमेंट होऊ शकते, त्यामुळे आयातीवर खर्च होणारे परकीय चलन तर वाचतेच, परंतु कालांतराने उद्योगांची क्षमता वाढून निर्यातक्षम उत्पादन केल्याने निर्यात वाढू शकते. तसे झाले तर पुन्हा ट्रेड डेफिसिट कमी

होऊन डॉलर ची मागणी कमी होऊन रुपया वधारू शकतो. पर्यायाने पुन्हा त्याचा अर्थव्यवस्थेला लाभ होऊ शकतो. स्थानिक रोजगार निर्मिती होते, सर्वसामान्यांच्या हातात थोडेफार खर्च करण्याइतपत पैसे खेळू लागतो. त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. सकारात्मक वातावरण निर्माण होते.

इतके साधे अर्थशास्त्र मंत्र्यांना व अधिकाऱ्यांना कळत नसेल का? बॅरल च्या किमती कमी झाल्या तरी देशांतर्गत इंधनाच्या किमती कमी होत नाही, मग हा फायदा कोणाला जातो? अर्थात रीफायनरींना व ऑइल प्रोड्युसिंग कंपन्यांना. मग ग्राहकांना म्हणजे सर्वसाधारण नागरिकांना हा फायदा का पोहचवला जात नाही? आणि मिळालेला फायदा जर भारत सरकारचाच असेल तर भारत सरकारच्या ट्रेझरी मध्ये हे पैसे का जमा होत नाही? त्याचा लेखाजोखा का दिला जात नाही? GST मुळे देशाची ट्रेझरी बळकट झाली चांगले झाले, परंतु मग देशावर असलेले कर्ज अनेक पटीने का वाढले? केंद्राकडून राज्यांना या GST चा योग्य वाट तत्परतेने का दिला जात नाही? अनुत्पादक बाबींवर खर्च केल्याने अर्थव्यवस्थेवर उलट परिणाम झाला आहे. रस्ते बांधले पण त्याचा टोल वसूल केला जातो, म्हणजे रस्ते बांधणीसाठी जागा व पैसे सरकारचे, त्याचा फायदा खासगी मालकांना? असे का? अनेक स्ट्रॅटेजिक असेटचे खाजगीकरण केले गेले आहे, हे धोकादायक आहे. अनेकविध टॅक्सेस लावल्याने अगोदरच गर्तेत पडलेला सर्वसामान्य माणूसच नाही तर अनेक नेते, विचारवंत आतातर इतके घाबरलेले आहेत कि ते आवाज देखील उठवू शकत नाही.

भारतासारख्या देशात शेतकरी जीवापाड मेहनत करून भरघोस उत्पादन घेतो, त्याला फायदा होण्याऐवजी ऐनवेळी अन्न धान्याच्या किमती पाडल्या जातात. ऐनवेळी निर्यात बंद केली जाते किंवा गरज नसतांना अन्नधान्याची आयात केली जाते. वर्षानुवर्षे भारत पाम ऑइल इतक्या मोठ्या प्रमाणात आयात करत आहे कि त्यामुळे देशातील तेलबियांची लागवड आणि देशी घाण्यातून खाण्याच्या तेलाचे उत्पादन प्रचंड कमी झाले. आज सगळ्या खाण्याच्या तेलात पाम ऑइल मिसळले जाते, ते का? आज भारतात कांद्याचे प्रचंड उत्पादन झाले आहे, जगभरात कांद्याची प्रचंड मागणी आहे, पण सरकारने निर्यातबंदी करून ठेवली आहे. आता नाफेड कांदा खरेदी करणार आहे असे कळले. सरकारी अन्नधान्य खरेदीत भ्रष्टाचार होतो, कवडीमोल किंमत देऊन शेतकऱ्याकडून खरेदी केलेले धान्य साठवण्याची क्षमतादेखील सरकारकडे नाही. जे साठवले जाते, ते राजकीय कारणांसाठी फुकट वाटले जाते, म्हणजे आयजीच्या जीवावर बायजी उदार. शेतकरी कर्जात आहे म्हणून कर्जमाफी करतात परंतु कर्जमाफीचा लाभ खऱ्या शेतकऱ्यांना होण्याऐवजी स्वतःला शेतकरी म्हणवणाऱ्या कृषी उद्योगालाच होतो आहे. मूळ शेतकरी आहे तिथेच आहे. शेतकऱ्यांच्या किमान दोन पिढ्या तरी शेतकरीविरोधी नीती धोरणे व कायद्यांनी बरबाद झाल्यात. भारतीय अर्थव्यवस्था कृषीमालाची प्रचंड निर्यात करू शकते, परंतु आजतागायत कृषीमालाच्या निर्यातीसाठी पुरेशी संसाधने, व्यवस्था, नीती व ध्येयधोरणे ठरवता आली नाहीत. किंबहुना जाणीवपूर्वक आयातधार्जिणे धोरणे ठरवली गेली असे म्हटले तर चुकीचे नसेल.

भारतीय अर्थव्यवस्था कृषिप्रधान आहे असे म्हणण्याचा काळ आता गेला. परंतु, भारतीय अर्थव्यवस्था किमान उद्योगप्रधान तरी आहे का? तर याचे उत्तर नाही असेच आहे व त्याचे कारण म्हणजे उद्योगाची निर्यातक्षमता विकसितच झाली नाही. उद्योगाला भारतीय बाजारपेठेची मागणीदेखील पूर्ण करता येत नाही, उद्योग आत्मनिर्भर नाहीत, कच्च्या मालाची आयात बंद झाली, सुटे पार्टस चीन अथवा तत्सम देशांतून येणे बंद झाले तर भारतातला उद्योग बंद पडतो. किमतीच्या बाबतीत देशी उत्पादने चीन च्या मालाशी बरोबरी करू शकत नाही, त्यामुळे हळूहळू ते देशी उद्योगच बंद पडत चालले आहेत. हे फार धोकादायक आहे.

देशाची दिशा व अर्थनीती ठरवणारे नेतृत्व बहुरूपी आहे का अशी शंका येते. देशाचे अर्थनेतृत्व एक कसलेला अर्थशास्त्री व त्याचे उच्चविद्याविभूषित सहकारी करत होते तेव्हा अनेक गोष्टी देशापासून लपवल्या गेल्या असा आरोप करणारे आहेत. परंतु अर्थशास्त्री नसलेले आरबीआय गव्हर्नर, अर्थशास्त्री नसलेले अर्थमंत्री व त्यांचे सहकारी यांच्या कडे देशाची अर्थनेतृत्वाची धुरा सोपवली गेली. गेल्या नऊ वर्षात भारतीय अर्थव्यवस्था निर्यातक्षम झाली नाही, आयातीला पर्याय निर्माण करू अशी क्षमता उद्योगांमध्ये आपण निर्माण करू शकलो नाही, भारतीय रुपयाचे प्रचंड अवमूल्यन झाले ते आपण रोखू शकलो नाही, शेतकरी आत्महत्या आपण रोखू शकलो नाही, रोजगार निर्माण करू शकलो नाही, धरसोड वृत्तीने अनेक उद्योगांची पीछेहाट झाली, या

आरोपांना त्यांच्याकडे पटेल असे उत्तर नाही.

या वेळच्या संपादकीयात मी आकडेमोड दिलेली नाही. त्याचा काही उपयोग नाही. जे जे होईल ते ते पाहावे अशी हताश परिस्थिती देश पातळीवर व राज्य पातळीवर आली आहे. उगीच रंगरंगोटी करून अमृतकाल महोत्सव साजरा करून सत्य बदलणार नाही. ज्यावेळी रुपया व डॉलर एकसमान पातळीवर येतील, किमानपक्षी एका रुपयाची किंमत डॉलरच्या तुलनेत वीस रुपयाच्या आसपास येईल, पेट्रोल डिझेल च्या किमती चाळीस रुपयाच्या खाली येतील, चलनवाढीचा दर चार टक्क्यांखाली येईल, एक्स्पोर्ट ओरिएंटेड इकॉनॉमी च्या मागे न धावता इम्पोर्ट सब्स्टिट्यूट पर्याय निर्माण करून आयात कमी करून देशी उद्योगाला व अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, देशाचा शेतकरी कर्जमुक्त होईल, किंबहुना शेतकरी व शेती हि देशाची लायबिलिटी न राहता शेतकरी व शेती पुन्हा एक जबाबदार असेट म्हणून प्रस्थापित होतील म्हणजेच खऱ्या अर्थाने शेतकरी भारताचा व जगाचा पोशिंदा होईल.... तेव्हा अमृतकाळाची सुरवात झाली असे आपण खात्रीने म्हणू शकतो. तोपर्यंत रुपयाची व बहुरूप्यांची घसरण पाहणे एवढेच आपल्या हातात आहे असे आपल्याला खेदाने म्हणावे लागेल.

या विषयापलीकडे जाऊन या अंकात आपल्या आसपास भारतात जे समाजपयोगी काम करत आहेत ते भारताचे पासपोर्ट मॅन श्री. ज्ञानेश्वर मुळे व चिलीसारख्या लॅटिन अमेरिकेतील देशात चार दशकापूर्वी जाऊन जाऊन आपले स्थान ओळख निर्माण केली व तरीही मातृभूमीबद्दल त्याचे प्रेम व जिव्हाळा कायम राहिला ते श्री किशन दादलानी अशा दोन सन्मान्य व्यक्तींची मुलाखत आपण प्रकाशित करत आहोत. अशा चांगल्या व्यक्तींमुळेच राष्ट्र, राष्ट्रीयत्वाची भावना व सकारात्मक वातावरण कायम राहील. म्हणून त्याचा आपण आदरयुक्त सन्मानच केला पाहिजे. अनिवासी भारतीयांचे योगदान नेहमीच गौरवले जाईल व विश्व पांथस्थ तर्फे त्याच्या करता जे जे काही चांगले करता येईल ते आपण करण्याचा प्रयत्न आपण विश्व पांथस्थाच्या व्यासपीठावरून नेहमीच करत राहू.

**डॉ. संदीप कडवे**
**०४ मार्च, २०२३, पुणे.**


**FORM IV**

Statement about ownership and other particulars about newspaper VISHWA PANTHASTHA to be published in the first issue every year after the last day of February

1. **Place of publication :** A-703, Nisarga City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune -411 057.
2. **Periodicity of its publication :** Monthly
3. **Printer's Name :** Sandeep Vasantrao Kadwe Nationality : Indian Address : A-703, Nisarga City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune - 411 057.
4. **Publisher's Name :** Sandeep Vasantrao Kadwe
   **Nationality :** Indian
   **Address :** A-703, Nisarga City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune - 411 057.
5. **Editor's Name :** Sandeep Vasantrao Kadwe
   **Nationality :** Indian
   **Address :** A-703, Nisarga City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune - 411 057.
6. **Names and addresses of individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one per cent of the total capital.**
   Sandeep Vasantrao Kadwe
   A-703, Nisarga City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune-411 057.
   I, Sandeep Vasantrao Kadwe, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

   Date : 4th March 2023 Sd/ Signature of Publisher

# विदेशातील भारतीयांचे भारतासाठी मोठे योगदान - डॉ ज्ञानेश्वर मुळे

## मुलाखतकार - सौ.धनश्री कमलेश पाटील



दरवर्षी ९ जानेवारी रोजी भारतात प्रवासी भारतीय दिन साजरा केला जातो. या निमित्ताने हजारो प्रवासी भारतीय (NRI PIO OCI) या संमेलनात सामील होतात. परदेशात राहणाऱ्या भारतीयांशी असलेले आपले नाते पुन्हा एकदा समजावून घेऊन त्याचे नव्याने मूल्यमापन करण्याची संधी या वर्षी इंदोर येथे साजऱ्या झालेल्या सतराव्या प्रवासी भारतीय दिना निमित्त आपल्याला लाभली.

याच निमित्ताने डॉ. ज्ञानेश्वर मुळे, माजी राजदूत, सदस्य, राष्ट्रीय मानवाधिकार आयोग भारत सरकार. यांची मुलाखत घेऊन प्रवासी भारतीयांचे भारता करिता योगदान व त्यांच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्याची संधी सौ. धनश्री कमलेश पाटील यांना लाभली. विश्व पांथस्थांकरता दिलेल्या या विशेष मुलाखतीकरता डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांचे मनापासून आभार. तसेच हि मुलाखत घेतल्याबद्दल व REDIO या सामाजिक संस्थेतर्फे अनेक अनिवासी भारतीयांना मदतीचा हात देणाऱ्या सौ.धनश्री कमलेश पाटील यांचेदेखील मनापासून आभार व त्यांच्या पुढील कार्याकरिता विश्व पांथस्थ तर्फे अनेक शुभेच्छा !

*** सर नुकताच प्रवासी भारतीय दिवस साजरा झाला. प्रवासी भारतीय दिवसाचे महत्व, भारत सरकारची आयोजन मागील भूमिका आणि ह्या माध्यमातून भारत सरकार आणि विदेशातील नागरिक यांच्या मध्ये साधला जाणारा समन्वय या वर आपले मत सांगू शकाल का**

प्रवासी भारतीय दिना निमित्त आयोजित केले जाणारे हे अधिवेशन म्हणजे जगभरातून येणाऱ्या भारतीयांचे एक संमेलन असते. जगभरातील कोणत्याही देशाच्या अनिवासी नागरिकांच्या संमेलनास इतके लोक जमत नाहीत. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सक्रिय सहभागामुळे प्रवासी भारतीयांचा उत्साह वाढतो. या साऱ्यांना आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, तांत्रिक अशा अनेक क्षेत्रात आपल्या मूळ देशाशी भागीदारी करायची असते. प्रवासी भारतीयां समवेत पंतप्रधानांनी घेतलेल्या सभांना प्रचंड उपस्थिती असते. या सभांमुळे उच्च मापदंड तर तयार होतातच शिवाय परदेशातील भारतीयांच्या समूहा बाहेर त्या त्या देशात प्रचंड सद्भावना निर्माण व्हायला साहाय्य लाभते. जागतिक पटलावर भारताच्या वाढत्या आकांक्षांना पाठिंबा मिळविण्यात महत्वाची भूमिका बजावण्याचे क्षमता प्रवासी भारतीयांमध्ये आहे

*** सर आपण अनेक देशात राजदूत होता. त्या निमित्ताने अनेक अनिवासी भारतीयांबरोबरच आपला संपर्क आला असेल तर अनिवासी भारतीयांचे योगदान या बद्दल आपले मत काय आहे.**

अनिवासी भारतीयां चे भारताच्या विकासामध्ये आणि राष्ट्र बांधणीच्या कार्यामध्ये खूप मोठे योगदान आहे. अगदी आर्थिक शब्दांमध्ये बोलायचे असेल तर जवळजवळ ८० बिलियन म्हणजेच ८० अब्ज डॉलर्स भारतामध्ये अनिवासी भारतीय पाठवितात. या मध्ये भारतीय नागरिकांचा समावेश आहे हे विसरून चालणार नाही. २ प्रकारचे भारतीय विदेशात राहतात. ज्यांनी इतर देशाचे नागरिकत्व स्वीकारले आहे असे भारतीय, आणि जे भारताचे नागरिक आहेत पण विदेशात राहतात असे भारतीय. या दोघांनीही भारताच्या सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक विकासासाठी महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. आजही अनेक अनिवासी भारतीयांनी हॉस्पिटल्स, शाळा, सार्वजनिक उपयोगात असलेल्या इमारती अशा अनेक गोष्टींमध्ये योगदान केलेले आहे. आणि आज जेव्हा भारत आर्थिक विकासा मध्ये घोडदौड करीत आहे तेव्हा त्यांची गुंतवणूक देखील आपल्या देशाच्या विकासात मदत करीत आहे.

*** विदेशात असणाऱ्या भारतीयांसाठी काही पुनर्वसन योजना आहेत का**

विदेशातील भारतीयांसाठी पुनर्वसन योजना मुख्यतः भारतीय वंशाचे लोक बाहेर जातात अनेकदा त्यांना हाल अपेष्टा ना सामोरे

जावे लागते उदाहरणार्थ त्यांचे जे करार असतात त्या करारा प्रमाणे त्यांना वागणूक मिळत नाही, पगार मिळत नाही, ऐनवेळेस करारातील अटींमध्ये बदल करण्यात येतो, बरेच दा त्यांचा मालक बदलतो, त्यांचे मालक त्यांचा शारीरिक, मानसिक व काही वेळेस लैंगिक छळ देखील करतात. त्यांना बरेच वेळा हाकलून दिले जाते. अशा वेळी भारताच्या विदेश मंत्रालयाची इंडियन कम्युनिटी वेल्फेअर फंड हा निधी भारतीय दूतावासा मध्ये उपलब्ध असतो. त्या निधी द्वारे आपल्या भारतीयांना विशेषतः अडचणीत असलेल्या तसेच गरजू भारतीयांची मदत केली जाते. त्या मध्ये त्यांचा खर्च उदाहरणार्थ वैद्यकीय खर्च, त्यांना लागणारी कायदेशीर मदत, त्यांना राहण्यासाठी आसरा अशी व्यवस्था केली जाते. या करिता विदेशात अडचणीत असलेले लोक तेथील भारतीय दूतावासाला संपर्क करू शकतात व मदत मागू शकतात.

**⁕ विदेशात राहणाऱ्या भारतीयांसाठी काही योजना आहेत का त्या बद्दल माहिती आपल्या ह्या मुलाखतीच्या माध्यमातून अनिवासी भारतीयांना आपण द्याल का.**

विदेशात राहणाऱ्या भारतीयांसाठी आणि भारतीय वंशाच्या लोकांसाठी अनेक योजना विदेश मंत्रालय राबवित असते त्यातील प्रमुख योजना पुढील प्रमाणे.

विदेशात जे भारतीय आहेत पण त्यांच्या कडे भारतीय नागरिकत्व नाही अशा युवकानं साठी Know India Program KIP राबविला जातो ज्या मध्ये दरवर्षी २०० ते २५० युवकांना भारतात आमंत्रित केले जाते. आणि त्यांना भारत दाखविला जातो .या शिवाय विदेशात जे वृध्द भारतीय नागरिक राहत असतील त्यांच्या करिता तीर्थ यात्रा ही योजना आहे ज्या मध्ये ६0 वर्षा वरील विदेशातील भारतीय वंशातील लोकांना भारत दाखविण्याची सोय आहे. या मध्ये सर्व धर्माच्या तीर्थ स्थळांना भेट देण्याची सोय आहे. या शिवाय भारतीय वंशाच्या नागरिकांसाठी तसेच त्यांच्या मुलांसाठी आंतरराष्ट्रीय प्रश्न मंजुषा ही स्पर्धा असते. अनिवासी भारतीयांना OCI (overseas citizenship of India card) कार्ड दिले जाते. या कार्ड मुळे अनिवासी भारतीयांना भारतात दीर्घकालीन वास्तव्य करता येते, भारतात नोकरी करता येते तसेच भारतातील अन्य संधींचा फायदा घेता येतो. या शिवाय प्रवासी भारतीय दिनाच्या निमित्ताने दर दोन वर्षांनी प्रवासी भारतीय सन्मान हा पुरस्कार विदेशात राहणाऱ्या भारतीयांना दिला जातो या पुरस्काराची संख्या ३0 असते.या समारंभास भारताचे राष्ट्रपती तसेच पंतप्रधान उपस्थित असतात.

**⁕ विदेशातील भारतीयांना मतदानाचा अधिकार मिळावा या साठी अनिवासी भारतीयांची मागणी होत असते त्या बद्दल आपले मत काय आहे ?**

तांत्रिक दृष्ट्या विदेशातील भारतीयांना मतदानाचा अधिकार आहे. फक्त त्या मध्ये गैरसोय आहे की त्यांना जर मतदान करायचे असेल तर त्यांना भारतात यावे लागते व जेथे त्यांचे नाव मतदार नोंदणी यादी मध्ये नोंद आहे तेथून ते मतदान करू शकतात. परंतु ते ज्या देशात राहत आहेत त्या देशा मध्ये राहूनच तेथून मतदान करता यावे ही मागणी विदेशातील भारतीय नागरिकांकडून होत आहे. ही प्रक्रिया कशी करावी या वर भारत सरकार गांभीर्याने विचार करीत आहे. परंतु ह्या मध्ये अनेक तांत्रिक अडचणी असल्याने या वर ठोस पाऊल उचलणे सोईचे ठरणार नाही असे मला वाटते.

**⁕ पांथस्थ ह्या उपक्रमाबद्दल आपले काय मत आहे.**

पांथस्थ हा अत्यंत सुंदर उपक्रम आहे. विदेशात जवळ जवळ साडे तीन कोटी भारतीय वंशाचे लोक आणि भारतीय नागरिक राहत जरी असले तरी त्यांच्या बातम्या ना आजही वृत्तपत्रांमध्ये छोटी जागा देतात. याचा अर्थ असा की अशा बातम्यांना भारतात आजही महत्व दिले जात नाही. पण हा भारताचा एक मोठा घटक विदेशात राहत आहे आणि भारतासाठी मोठे योगदान करीत आहे अशा वेळी विश्व पांथस्थ मासिका मधून विदेशातील भारतीयांचे अतिशय उत्तम प्रकटीकरण आणि प्रतिनिधित्व होत आहे. अशा प्रकारच्या मासिकांची आजच्या काळात समाजाला अतिशय आवश्यकता आहे. विशेषतः जे लोक विदेशात राहून यशस्वी होतात त्यांच्या यशोगाथा आणि जे लोक विदेशात राहतात आणि संकटात अडकतात त्या संकटांचे वर्णन हे दोन्ही लोकांपर्यंत पोहचणे आवश्यक आहे. म्हणजे नवीन पिढीस सारासार बुध्दीने विचार करणे सहज शक्य होईल असे वाटते. पांथस्थ सारख्या अभिनव उपक्रमास हार्दिक शुभेच्छा.

**शब्दांकन - धनश्री कमलेश पाटील**

**सीईओ रेडिओ (Rescuing Every Distressed Indians Overseas)**

# विदेशातील भारतीयांना मदतीचा हात -
## REDIO ( Rescuing Every Distressed Indian Overseas)




जगभरात प्रवासी भारतीयांच्या समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत अश्यातच वाढणारी एक समस्या म्हणजे फसव्या एजेंट ने दिलेल्या खोट्या नोकरीच्या प्रलोभनांना फसून विदेशात गेलेले आणि तिथेच अडकून राहिलेले लोक. अशाच विदेशात अडकून राहिलेल्या लोकांसाठी तसेच विदेशात कोणाचा मृत्यू झाला असेल तर त्यांची डेड बॉडी भारतात कुटुंबीयापर्यंत पोहचविण्याचे कार्य करीत आहेत. REDIO ( Rescuing Every Distressed Indian Overseas) ह्या संस्थेच्या CEO धनश्री पाटील

धनश्री पाटील ह्या मूळच्या पुण्याच्या. शिक्षण पूर्ण झाल्या नंतर महाराष्ट्र शासन मान्य संस्था त्यांनी चालू केली आणि त्या माध्यमांतून अनेक महिलांना स्वयंरोजगार प्रशिक्षण देऊन स्वतःचा पायावर उभे राहण्यास मदत त्यांनी केली. त्याच दरम्यान लग्नानंतर त्यांचे पती कमलेश पाटील यांच्या नोकरी संदर्भात सौ.पाटील यांना दुबई येथे स्थायिक व्हावे लागले. दुबई येथील १० वर्षाच्या वास्तव्यात धनश्री यांनी सेलिब्रेशन इव्हेंट च्या माध्यमातून अनेक इव्हेंट केले.

स्वतःचा व्यवसाय सुरळीत चालू असताना त्यांच्या आयुष्यात अचानक एक वळण आले आणि विदेशातील अडचणीत असलेल्या लोकांना मदत करण्याची संधी सौ.पाटील यांना मिळाली. मार्च २०२० मध्ये जगभरात कोविड चे संकट आले आणि दुबई मधून भारतात व भारतात दुबई मधील विमान सेवा बंद झाली. वंदे भारत मिशन अंतर्गत बाकी सर्व राज्यात विमान सेवा चालू झाली पण महाराष्ट्रासाठी काही विमान सेवा चालू होई ना. त्या मुळे जवळ जवळ ६ हजार महाराष्ट्रीयन भारतात यायची वाट पाहत होते. ह्या मध्ये एक गर्भवती महिला, वयोवृद्ध पालक, अनेक मेडिकल इमर्जन्सी असलेले पेशंट होते. त्या वेळी ह्या सर्व लोकांना मदत करण्यासाठी धनश्री यांनी पुढाकार घेतला. ह्या लोकांना व्हॉट्सप ग्रूप च्या माध्यमातून एकत्र आणले. अनेक लोकांची नोकरी गेली होती त्यांना किराणा पुरविणे, मोफत वैद्यकीय सुविधा पुरविणे, काहींचे घराचे भाडे भरणे हे कार्य त्यांनी दुबई मधील सामाजिक संस्थांच्या मदतीने केले. त्याच दरम्यान त्यांचा संपर्क दुबई मधील व्यावसायिक श्री राहुल तुळपुळे याच्या बरोबर झाला. श्री. राहुल तुळपुळे यांच्या सहकार्याने महाराष्ट्र मध्ये पहिल्या दोन चार्टर फ्लाईट चे आयोजन केले. तसेच दुबई मधील अल आदिल ट्रेडिंग चे धनंजय दातार यांच्या मदतीने हजारो भारतीय मजुरांना मोफत भारतात येण्यास मदत केली. त्या मुळे सौ पाटील यांचा नंबर फक्त दुबई मध्ये नाही तर सौदी मधील कामगार वर्गा पर्यंत पोहचला. लोकांचे भारतात येण्यासाठी मदत मागण्यासाठी अनेक फोन येऊ लागले. हे सर्व मदत कार्य धनश्री परराष्ट्र मंत्रालयाचे माजी सचिव डॉ ज्ञानेश्वर मुळे यांच्या मार्गदर्शनाने करू लागल्या परंतु ह्या कार्याचा पूर्ण जगभरात विस्तार करावा अशी इच्छा व्यक्त करून मुळे सरांनी रेडिओ ह्या संस्थेची जबाबदारी धनश्री यांच्या वर सोपविली. धनश्री रेडिओ ह्या संस्थेच्या CEO म्हणून कार्य करीत आहेत.

REDIO ( Rescuing Every Distressed Indian Overseas) हा उपक्रम डॉ ज्ञानेश्वर मुळे, माजी सचिव विदेश मंत्रालय, सदस्य राष्ट्रीय मानवाधिकार आयोग यांच्या चांगुलपणाच्या चळवळी चा एक उपक्रम आहे . ज्या अंतर्गत विदेश स्थित अडचणीत असलेल्या भारतीयांना भारतात परत येण्यासाठी मदत केली जाते. भारतातील ३ कोटी पेक्षा जास्त लोक विदेशात राहतात. हे लोक वेगवेगळ्या कारणांनी विदेशात संकटात सापडतात कधी त्यांना फसविले जाते, अनेकांचे पासपोर्ट कंपनी मालका कडून जप्त केलेले असतात, काही लोक निर्दोष असताना देखील तुरुंगात अडकतात. अशा लोकांना मदत करण्या करिता भारत सरकार तत्पर असते पण अशा वेळी नक्की मदत कुठून आणि कशी मिळेल हे अनेक लोकांना माहीत नसते. अशा वेळी या लोकांना योग्य दिशा देऊन भारतीय दूतावास व आमचे विदेशातील सल्लागार यांच्या मदतीने आज पर्यंत अनेक भारतीयांना आम्ही भारतात येण्यास मदत केली आहे. सुमारे २२ देशात रेडिओ संस्था कार्यरत आहे. अनेक महिला फसव्या एजंट च्या प्रलोभनांना बळी पडून अखाता मध्ये संकटात सापडतात अशांना देखील रेडिओ च्या माध्यमातून मदत केली गेली आहे. नुकतेच ओमान येथे फसव्या एजंट मुळे अडकलेल्या ४८ कामगारांची सुटका सौ पाटील यांनी ओमान एंबेसी च्या मदतीने केली.

बाहेर देशात मोठ्या पगाराची नोकरी मिळवून देतो असे सांगून अनेक फसवे एजंट युवकांना visit visa वर विदेशात पाठवितात. तेथे पोहचल्यावर या युवकांचे पासपोर्ट एजंट जप्त करतात. एखादा महिना त्यांना नोकरीवर ठेवले जाते. त्या नंतर त्यांचे खरे हाल चालू होतात. त्यांना नोकरी वरून काढून टाकले जाते. त्या देशाचा विसा न काढता बेकायदेशीर रित्या त्यांच्या कडून काम करून घेतले जाते. जास्त तास काम, खाण्या चे हाल, राहण्याची सोय नसते. पासपोर्ट नसल्याने हे लोक भारतात परत देखील येऊ शकतं नाहीत. अशा वेळी अडकलेल्या लोकांना रेडिओ सारखी संस्था मदत करू शकते. एखादी व्यक्ती भारता बाहेर अडचणीत आली तर त्यांनी त्या देशातील भारतीय दूतावास मध्ये थेट संपर्क साधावा. तेथे तात्पुरत्या स्वरूपाचा पासपोर्ट देण्याची व्यवस्था भारत सरकार ने केलेली असते. ज्या मार्फत ते भारतात प्रवास करू शकतात. तसेच विदेशात नोकरी साठी जाताना कधी ही visit visa वर जाऊ नये. भारत सरकार चे e migrant portal आहे तेथे भारत सरकार मान्य एजंट ची लिस्ट असते त्या मार्फत नोकरी करिता जावे.

सर्व सामान्य जनतेला या मध्ये सामील होऊन विदेशातील बंधू भगिनींना मदत करावी असा उद्देश रेडिओ चा आहे. तसेच फसव्या एजंट च्या नोकरीच्या खोट्या अमिषाला भुलून न जाता भारत सरकार ने ठरवून दिलेल्या प्रक्रिया पुर्ण करून, योग्य कागदपत्रांची पडताळणी करूनच विदेशात जावे, सर्व सामान्य जनतेने विदेशात जाण्या पूर्वी ही खबरदारी घेतली तर तिथे जाऊन ते संकटात सापडणाऱ्या नागरिकांची संख्या कमी होईल....असे सौ.पाटील यांनी सांगितले. विदेशात जाण्या पूर्वी कशा प्रकारची खबरदारी घ्यावी, तसेच कोणत्या कागदपत्रांची पूर्तता केली असावी, सरकारमान्य एजंट ची पडताळणी कशी करावी या साठी रेडिओ च्या माध्यमातून जनजागृती अभियान राबविण्यात येणार आहे.

रेडिओ ह्या संस्थेचे कार्य मुख्य करून दुबई, शारजा, संपूर्ण आखाती देशात, सौदी अरेबिया, कॅनडा, लंडन, पोलंड, साऊथ आफ्रिका, सिंगापूर, मलेशिया, थायलंड, चीन, अमेरिका, जर्मनी अशा अनेक देशांमध्ये चालते. नुकतेच झालेल्या रशिया युक्रेन युद्ध परिस्थिती मध्ये सौ.पाटील व रेडिओ टीम ने ४८२० विद्यार्थ्यांना भारतात येण्यास मदत केली. युक्रेन येथील भारतीय दूतावास, भारत सरकार आणि विद्यार्थी पालक यांच्या मधील दुवा म्हणून धनश्री व त्यांच्या सहकाऱ्यांनी उत्तम भूमिका बजावली.

भारतात देखील या संस्थेचे काम उल्लेखनीय आहे. आखाती देशात २ महिने एका मृत व्यक्ती चे शव भारतात नातेवाईकांचा शोध न लागल्याने आखातातील रुग्णालयात २ महिने अंत्यसंस्काराच्या प्रतीक्षेत असतात रेडिओ टीम च्या सहकार्याने त्या मृत व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध अवघ्या १ तासात केरळ मध्ये लावला गेला व त्वरित त्या मृत व्यक्तीच्या अंत्य संस्काराचे कागदोपत्री औपचारिकता पूर्ण करण्यात आली. नुकतेच सौदी अरेबिया, मालदीव, व दुबई येथून मृत व्यक्तींचे शव त्यांच्या कुटुंबीय पर्यंत पोहचविण्याचे सेवा कार्य रेडिओ ने केले. अनेक वेळा एखाद्या व्यक्तीचा मृत्यू होऊन १-२ महिने होतात पण कुटुंबीयांचा संपर्क होऊ न शकल्याने शव परदेशात असते.



नुकतेच मालदीव येथे एका गृहस्थांचा हृदय विकाराने मृत्यू झाला. रेडिओ चे मालदीव चे सल्लागार कर्नल विनो यांनी धनश्री पाटील यांना संपर्क करून कळविले की त्या व्यक्तीच्या कुटुंबीयांचा फोन नंबर मिळत नसल्याने बॉडी पाठविण्याचे काम थांबले आहे. त्या वेळी धनश्री पाटील यांनी तेलंगाना चे पोलीस कमिशनर श्री.महेश भागवत सर यांना संपर्क केला असता. श्री.महेश भागवत व त्यांच्या सहकाऱ्यांच्या साहाय्याने २० मिनिटात कुटुंबीयासमवेत संपर्क झाला. अशा प्रकारे प्रशासनाच्या मदतीने रेडिओ नागरिक व प्रशासन यांच्या मधील दुवा म्हणून काम करते. मर्चंट नेव्ही मध्ये नोकरी करीत असताना विदेशात अडचणीत सापडलेल्या अनेक लोकांना रेडिओ मदत कार्य करीत असते.

विदेशातील भारतीयांना मदत करण्याच्या आमच्या ह्या कार्यात सर्व सामान्य नागरिकांनी देखील सामील व्हावे असे आवाहन धनश्री पाटील यांनी केले

# चिलीतील पांथस्थ - किशन दादलानी

विश्व पांथस्थ मध्ये आपण नेहमीच परदेशस्थ भारतीयांची ओळख करून देत असतो. पांथस्थाचा प्रवास फार रोचक असतो. असाच रोचक प्रवास श्री.किशन दादलानी यांचा आहे. किशन दादलानी यांची भेट नाशिकचे पांथस्थ प्रवीण मानकर यांच्या माध्यमातून झाली. त्यांच्या किशनजींच्या ओळखीचा किस्सा प्रविण मानकारांच्याच शब्दात, थोड्या संपादकीय संस्कारांनंतर.



परवा मी 'मन्तरंग फिल्म क्लब' मध्ये शॉर्ट फिल्म्सची समीक्षा करत होतो. बहुसंख्य लोक मराठी असल्याने मराठी कटाक्षाने वापरत होतो आणि सिनेमॅटोग्राफी या अंगावर भाष्य करत होतो. 'स्पर्श' ही थिम असलेला कार्यक्रम छान पार पडला.

डी जे हंसवानी, माझे मित्र, यांनीही कार्यक्रम बघितला - त्यांच्या मित्रांसोबत. मित्राने कार्यक्रम 'ऐकला' असं म्हणणं योग्य राहील कारण कार्यक्रम संपल्यावर हंसवानी यांनी मित्राची ओळख करून दिली. सांगितलं - हा माझा मित्र 'चिली' या देशातून आला आहे. नाव - किशन ददलानी. भारतीय - नाशिकचा. 'प्रवासी भारतीय दिवस' या कार्यक्रमासाठी आलेला आहे. या पंचावन्न मध्ये जन्म झालेल्या 'किशनचं' लहानपण नासिकच्या गल्ली बोळात तर मोठेपण सँटियागो येथे. सक्षम व्यावसायिक आहे. सध्या मजा करत आहे'.

*चिली या देशाचं नाव घेताच माझा अँटेना - संवेदनाग्र जागा झाला. चिली म्हणजे लॅटिन अमेरिकन देश. साऊथ अमेरिका माझ्या बकेट लिस्ट मध्ये असलेला प्रांत - चिली, अर्जेन्टिना, ब्राझील, कोलंबिया, पेरू, पराग्वे, वगैरे देश. इच्छा असूनही न भेट दिलेले देश - कारण? सुरक्षेचा अभाव*.




मी विचारलं हंसवानी यांना - मग किशनजी येथे कसे? त्यावर किशनजी मराठीत उत्तरले 'मला मराठी ऐकायचं होतं म्हणून. गेले दोन तास मी खूप मराठी ऐकलं तुमच्याकडून आणि पाहिलं फिल्म्स मधून. मजा आली. १९५५ - १९७५ हा नासिकमधील काळ डोळ्यासमोरून गेला. मी चिलीत 'इंडियन असोसिएशनचा' प्रेसिडेंट आहे'. किशनजी यांचा संपर्क इतर देशातील इंडियन असोसिएशनशी / महाराष्ट्र मंडळाशी सुद्धा आहे.

काल हंसवानी सर किशनजी यांना घरी घेऊन आले. तासभर भरपूर गप्पा झाल्या. उल्कानेही 'आमच्या संभाव्य यजमानाचे' समयोचित आदरातिथ्य केले. आमच्या घरात कोणताही माणूस 'मोकळेपणा' महसूस करतो. आम्हीं गप्पा डायनिंग टेबलवर मारल्या. माझं शंका निरसन तर झालंच पण या देशातील सुरक्षेबाबतीत असलेली काल्पनिक 'भीती' कमी झाली. किशनजींनी कुठे, कसं, का जायचं ते सांगितलं. मी रेल्वेने किंवा बसनेच प्रवास करणार हे ऐकून त्यांना आश्चर्य वाटलं. मग त्यांना सांगितलं - सर मी बॅकपॅकर आहे.

हंसवानी यांच्या मुळे नवा 'अध्याय' सुरु झाला आहे जो मी कधीच बंद केला होता.

मानकारांच्या या ओळखीनंतर त्यांनी किशनजी व हंसवाणीजी यांचा संपर्क विश्व पांथस्थ च्या संपादकांशी करून दिला. या दोघांशीही मग संपादकांनी फोनवर मनमोकळ्या गप्पा मारल्या. हंसवाणीजी नाशिकमधील प्रख्यात बिल्डर आहेत. किशनजींशी बोलतांना चिलीतील या पांथस्थाची अतिशय रोचक व अभिमानास्पद जीवनगाथा उलगडली.

चिलीसारख्या लॅटिन अमेरिकेतील देशाबद्दल भारतात खूप लोकांना फार माहिती देखील नाही. पनामा कालवा देखील १९८० ला बांधला गेला. त्यापूर्वी अटलांटिक व पॅसिफिक महासागरांना जोडणारे पुंता अरेनास हे दक्षिण अमेरिकेतील, ज्याला आपण लॅटिन

अमेरिकादेखील म्हणतो, महत्वाचे बंदर होते. हे बंदर चिली या देशात आहे. चिली हा देश पॅसिफिकच्या बाजूला लॅटिन अमेरिकेचा संपूर्ण पश्चिम किनारा व्यापणारा देश म्हणून आजही ओळखला जातो. या पुंता अरेनास या दक्षिण टोकाकडे असलेल्या शहरात १९०७ साली पहिल्यांदा दोन सिंधी बांधवांनी एका जहाजाने आगमन केले. नांदवाणी व मायानी अशी या धाडसी भारतीयांची नावे. त्यांनी तिथे आपला व्यापार स्थापित केला. उत्तर अमेरिकेकडे जाणारी सर्व जहाजे पुंता अरेनास या ठिकाणी थांबत असत. त्यामुळे व्यापारासाठी हे एक उत्तम ठिकाण होते. जवळच्या पेरू बोलिव्हिया अर्जेन्टिना या देशात इथूनच माल पाठवला जात असे. साधारण १९२० नंतर भारतातून अनेक सिंधी बांधव पुंता अरेनास व उत्तरेकडे आयकीकी  या शहरात व्यापारासाठी स्थलांतरित झाले.

किशन दादलानी यांचा जन्म १९५५ साली इंडोनेशिया येथे झाला. परंतु त्याचे शालेय शिक्षण नासिक येथे १९७५ पर्यंत व पुढे मद्रास येथे झाले. १९७८ साली किशनजी सर्वप्रथम चिली या देशाला पुंता अरेनास या ठिकाणी नोकरीसाठी गेले. तिथे त्यांनी इम्पोर्ट एक्स्पोर्ट चा बिझनेस सांभाळला. हे फ्री पोर्ट असल्याने भारतातून व चीनमधून येथे अनेक प्रकारच्या मालाची आयात निर्यात होत असे. पुंता अरेनास हे अंटार्टिकाला जाण्यापूर्वीच शेवटचे बंदर आहे. येथूनच अंटार्टिकाच्या कॅम्प साठी सामग्री पाठवली जात असे, त्यामुळे येथे अनेक भारतीय शास्त्रज्ञ, अभियंते, सैन्यदलाचे अधिकारी यांची वर्दळ असते. किशनजी व त्यांच्या परिवाराने लवकरच स्पॅनिश शिकून व व्यापाराचे तंत्र शिकून स्वतःचा व्यापार सुरु केला व ते आयकिकी या उत्तरेकडील शहरात १९८५ साली स्थलांतरित झाले. त्यानंतर तेथूनच जवळ असलेल्या अरिका या शहरातून त्यांनी जवळच्या पेरू व बोलिव्हिया या देशांशी व्यापार केला. १९८२ साली किशनजींना मुलगा झाला व १९८८ साली त्यांना मुलगी झाली. त्यानंतर १९९१ साली किशनजींनी सान्तियागो या चिलीच्या राजधानीच्या शहरात स्थलांतर करण्याचा निर्णय घेतला. मुलांचे शिक्षण व कुटुंबाची सुरक्षितता हे त्याचे मुख्य कारण होते. आता ६८ वर्षे वय असलेले किशनजी प्रवासी भारतीय दिवसासाठी इंदूर येथे आले व तिथून ते त्यांचे मूळ गाव असलेल्या नासिक येथे सध्या काही दिवस वास्तव्य करत आहेत. अर्थात नासिकमधूनही त्यांचे सँटियागो येथे बिझनेसचे व अनेक प्रकारचे सामाजिक कार्य चालूच आहे. किशनजी हे इंडियन असोसिएशन सँटियागो याचे अध्यक्ष म्हणून सर्वप्रथम २०१५ साली निवडून आले व त्यानंतर देखील त्यांनी अध्यक्षपदाची धुरा सांभाळली. चिली देशात स्पॅनिश बोलली जाते. त्यांच्या मते स्पॅनिश शिकणे काही कठीण नाही. त्यांच्याच भाषेत सांगायचे झाले तर स्पॅनिश हि इंग्लिशची भोजपुरी आहे. म्हणजे ज्याला हिंदी येते त्याला भोजपुरी कळते व हिंदी भाषिक लवकरच भोजपुरी शिकतो, त्याचप्रमाणे, ज्याला इंग्लिश येते तो लवकरच स्पॅनिश शिकतो. किशनजींचे भारताबद्दलचे प्रेम अबाधित आहे. त्यांना सध्याच्या पाकिस्तानातील सिंध प्रांताला, त्याच्या मूळ मातृभूमीला भेट देण्याची, तेथील मातीचे वंदन करण्याची खूप इच्छा आहे. सिंध प्रांत लवकरच स्वतंत्र राष्ट्र होईल अशी त्याची इतर अनेक सिंधी बांधवांप्रमाणे इच्छा आहे. किशन दादलानी हे आज चिली देशाचे नागरिक आहेत. त्यांची मुले त्याचा व्यवसाय सांभाळतात व त्याच्या स्वतःच्या क्षेत्रात देखील कार्यरत आहेत. कोमल दादलानी, किशनजींची मुलगी हि तिच्या आवडीच्या क्षेत्रात काम करत आहे.

जगभर गेलेल्या व स्वतःची अशी ओळख निर्माण केलेल्या किशन दादलानी यांच्यासारख्या धाडसी, मेहनती व देशप्रेमाने ओतप्रोत भरलेल्या पांथस्थांमुळेच भारताची व भारतीयांची सकारात्मक ओळख जगाला झाली. किशनजी, तुमचा व तुमच्या संपूर्ण परिवाराचा आम्हाला अभिमान आहे. आजवरच्या तुमच्या वाटचालीबद्दल आपले हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी



# क्या आप ठगी के शिकार है ?
## -स्टार्ट अप, उद्यमीता और रिअल इस्टेट का सच




यह पुरा फ्रंट पेज विज्ञापन नईदुनिया, पत्रिका और दैनिक भास्कर इंदौर नगर संस्करण में छपा है। ऐसेही विज्ञापन कई कोचिंग क्लासेस, निजी कॉलेज /विश्वविद्यालय के भी छपते है। कई बडे रिअल इस्टेट प्रोजेक्टस् के भी बडे बडे विज्ञापन हमेशा छपते रहते है।

जाहीर है इतना बडा बजेट रखनेकी हैसियत ऐसे बिझनेस की होती है। पर यह खर्चा वो अपने जेबसे तो नहीं देते है, सामान्य ग्राहकको इसकी किमत अंततः चुकानी पडती है। जितना भी जी एस टी (GST) बिज़नेस दे रही है, वो भी अंततः ग्राहक ही दे रहा है। महंगाई बढ़ने का कारण यही है। जाहीर है की ये सब बिझनेस बडे बडे शोरूम, ऑफिस, इमारते रखते है, जिसका किराया लाखोंमे होता है।

हमारे संपर्क में ऐसे कितने सारे स्टार्टअपस है जिनको अपने कर्मचारीओंकी पगारतक देनेके लिए पैसे नहीं बचते है। अच्छासा ऑफिस या दुकान किराएपे नहीं ले सकते। एक स्टार्टअप अगर ५०० स्केअर फ़ीट का ऑफिस भी अच्छी जगह लेना चाहें तो भी किराये की वजह से ले नहीं पाता। दुकान के सामने पार्किंग का पता नहीं होता, जहा ऑफिस मिलता है वहां कोई आता नहीं्। और हम स्टार्टअप इंडिया की बात कर रहे हैं्। मेक इन इंडिया की तो बात ही ना करें तो अच्छा है।

२०१९ में हमने इंदोर सत्यसाई चौराहे के पासमे एक बंद पडे रेस्टॉरंटकी २२०० स्क्वेअरफुट के दुकानका किराया पुछां, २,२५,००० रुपया प्रतिमाहका किराया था। शहर मे ऐसी कई बडी ईमारते है जो खाली पडी है लेकीन शोरूम मालिक किराया घटाने को तैयार नहीं। वह शोरूम खाली भी रहे तो शायद उनको कोई फर्क नहीं पडता। हो सकता है ऐसे सब प्रॉपर्टीज में काला धन लगाया हो, जो की अब सर्वज्ञात है। क्या यह सब टैक्स अथॉरिटीज को नहीं नजर आता? या फिर उनके ही भाईबंद इससे जुड़े हुए है, जिसकारण इन सबको नजरअंदाज किया जा रहा है? यह सब क्या दर्शाता है? अर्थव्यवस्था की हालत दर्शाता है, जो देखना चाहे वो देख सकता है और जिनको आँखे बंद रखनी है वो आँखे तो बंद रख सकता यही, पर उससे परिस्थिति बदलनेवाली नहीं। इसका मतलब साफ़ है, बिज़नेस चले या न चले, जिनका काला धन इन शोरूम में, इमारतोंमें, ऑफिसमे लगा है, वो सब भारीभरकम किराया वसूलते रहेंगे, चाहे बिज़नेस चले या ना चले।

रियल एस्टेट की कीमते और किराया काफी काम होने की जरुरत है, काफी सारे टैक्सेज और बेवहज कॉस्ट्स कम करने की जरुरत है, वैसेही अघोषित टैक्स भ्रष्टाचारी वसूली भी बंद होना जरुरी है, नहीं तो यह अर्थव्यवस्था टिक नहीं पायेगी।
(Aug १०, २०१९)

तीन साल में काफी पानी बह गया लेकीन इस पोस्टमें बताई गयी परीस्थिती नहीं बदली । AIC के तहत, कॉलेजेसके, युनिव्हर्सिटीके और निजी, बहुत सारे इनक्युबेशन सेंटर खोल रखे है पुरे भारत में, इसमे ज्यादातर लोग और संस्थाए सिर्फ को वर्कींग सेंटर का काम करते है । कॉलेज युनिव्हर्सिटीके इनक्युबेशन सेंटर तो ऐसे लोग चलाते है जिन्होने अपने पुरे जीवनमें कभी कोई धंदा, व्यवसाय, व्यापार, उद्यम कुछभी नहीं किया, शायद सिर्फ पढाने का काम किया है और अठरा महीनेके इनक्युबेशन प्रोग्रामके बाद इनक्युबेटीको केवल एक सर्टिफिकेट थमा दिया जाता है और रफादफा किया जाता है ।

काफी सारे स्टार्टअप आंत्रप्रुनर हमे मिलते है, उनका कहना है, यह तो रिअल इस्टेट रेंटींग मॉडेल है, उपरसे इनक्युबेशन सेंटर को सरकारसे करोड दो करोड ग्रँटभी मिलती है, अखबारोंमे नेताजीके साथ तस्बीर भी छपती है, पर नवउद्यमी जहां था वहीं है, शायद काफी पिछे हट गयां है । ऐसे सेंटरोंमें मेंटरींग सपोर्ट केवल नाममात्र है या पुरी तरहसें नदारद है । हमें कई ऐसे नवाचार उद्यमी पता है, उन्हे कई बार सरकारसें, नेताजी के हाथसे अवॉर्ड देके नवाजा गया है, पर फंडींग धेले की नहीं कि गयी । यह तो सरासर खिलवाड है नवउद्यमीयोंके साथ । पुरस्कारप्राप्त स्टार्टअप आंत्रप्रुनरभी कहते है, पुरस्कार और फंडींग का दुरदुरतक कोई रिश्ता नहीं है, सब इव्हेंट मॅनेजमेंटका खेल है ।

जी हां, आप ठगी के शिकार है, और यह जान लेना बहुत जरूरी है । सावधान हो जाईए ।

(August १०, २०२२)

# श्रीमंत हिरोजी इंदुलकर सेवा सन्मान पुरस्कार - महाराष्ट्र मंडळ गोवा



डॉ. दामोदर मगदूम | डॉ. संदीप कडवे | डॉ. जगन्नाथ पाटील | डॉ. सुजाता कदम | सरिता चव्हाण

**डॉ. मगदूम, डॉ. कडवे, डॉ. पाटील, डॉ. कदम, सरिता चव्हाण यांना मा.मुख्यमंत्री डॉ.प्रमोद सावंत यांच्या हस्ते पुरस्कार**




महाराष्ट्र मंडळ गोवा यांच्यातर्फे १८ व १९ फेब्रुवारी २०२३ रोजी मिरामार येथे शिवजयंती अतिशय उत्साहात व शिवमय वातावरणात साजरी करण्यात आली. तत्पूर्वी मंडळाने निवड समितीच्या वतीने २०२३ च्या श्रीमंत हिरोजी इंदुलकर सेवा सन्मानाची घोषणा केली. आपल्या कर्तृत्वाने देशभर कार्यरत असणाऱ्या चार सन्माननीय व्यक्तींना हा सन्मान या वर्षी घोषित झाला. डॉ दामोदर मगदूम हे पुणे येथे C DAC येथे महत्वाच्या पदावर कार्यरत आहेत व महाराष्ट्रदेशा फौंडेशन चे अध्यक्ष आहेत. डॉ संदीप कडवे यांनी गेल्या ३२ वर्षात देशात व परदेशात अनेक महत्वाची पदे भूषवली व ते विश्व पांथस्थ या अनिवासी भारतीयांसाठी असलेल्या मराठी मासिकाचे संपादक देखील आहेत. डॉ.जगन्नाथ पाटील हे जेष्ठ शिक्षण तज्ज्ञ असून NAAC च्या सल्लागार समितीवर महत्वाचे पद त्याच्याकडे आहे. डॉ.जगन्नाथ पाटील याच्या जीवनप्रवासावर आधारित पुस्तक चंबुखडी ड्रीम्स हे पुस्तक देखील अतिशय वाचनीय आहे. डॉ. सुजाता कदम या गोव्यात स्थापन झालेल्या ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ आयुर्वेद येथे डीन आहेत. सरिता चव्हाण यांनी अनेक क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाने ठसा उमटवला असून त्या गोव्यात राहतात.

महाराष्ट्र मंडळाच्या निवड समितीचे अध्यक्ष अनिल पाटील व मंडळाचे सचिव विजय कुडाळकर यांनी या पुरस्कारामागील भूमिका स्पष्ट केली. देशात तीन पायऱ्यांना अनन्यसाधारण महत्व आहे. पहिली पायरी आहे पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराची, संत चोखोबांची समतेची पायरी. दुसरी पायरी आहे नामदेवाची पायरी. ही पायरी आहे भक्तीच्या सन्मानाची. तिसरी व सर्वश्रेष्ठ पायरी आहे जाणता राजा स्वराज्यसंस्थापक छत्रपती शिवरायांच्या रायगडावरची, हिरोजी इंदुलकर यांची पायरी. ही पायरी आहे सेवेची. हिरोजी इंदुलकर म्हणजे शिवाजी महाराजांचे मुख्य अभियंता. स्वराज्याचे अभियंता हिरोजी इंदुलकर यांचे कार्यकर्तृत्व जगाच्या सेवेच्या इतिहासातील एक सुवर्णपान आहे. सरदार इंदुलकरांनी निरपेक्ष भावनेने उभारलेले अनेक गड किल्ले शेकडो वर्षेनंतरही आजही स्वराज्याची साक्ष देत उभे आहेत. ही सेवा राज्याच्या व जनतेच्या प्रति वाहिलेली अत्युच्च सेवा आहे. याच सेवाभावनेतून देशभर व जगभर कार्यरत असलेल्या अनेक मान्यवरांच्या कार्याची दाखल घेत त्याच्या कार्याचा सन्मान करण्यासाठी श्रीमंत हिरोजी इंदुलकर सेवा सन्मान देण्यात येतो.




श्री. अनिल पाटील व मंडळाचे सक्रिय सभासद यांनी सेवा सन्मान प्राप्त मान्यवरांची ओळख करून दिली. मा. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मान्यवरांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह देऊन सत्कार सन्मान करण्यात आला. सरदार हिरोजी इंदुलकर प्रतिष्ठानातर्फे उदय धर्माजी इंदुलकर यांनी मान्यवरांचा पगडी देऊन सत्कार केला. या प्रसंगी सर्व मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ राजेश परब, औषध तज्ज्ञ हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. कार्यक्रमापूर्वी भव्य शोभायात्रा काढण्यात आली व नंतर मंचावर मंडळाच्या स्थानिक कलाकारांनी आपली कला सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केलं. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनिल पाटील व विजय कुडाळकर यांच्याबरोबर राजाराम पाटील, छाया पाटील, श्रद्धा खलप, विशाल गायकवाड, अंजु देसाई व इतर अनेक कार्यकर्त्यांनी प्रचंड मेहनत घेतली.







## तुमचा व्यवसाय, उद्योग, सेवा जगभरच्या निवडक लोकांपर्यंत कसा काय पोहचेल? विश्व पांथस्थच्या साहाय्याने

**विश्व पांथस्थ मासिकात जाहिरात का करावी**

अनिवासी भारतीय जवळपास ४८ पेक्षा जास्त देशांत स्थलांतरित झाले आहे. जवळपास २ करोड पेक्षा जास्त भारतीय या देशांत वास्तव्य करत आहेत. त्यापैकी मराठी अनिवासी साधारण २० लाख असतील. हे मराठी व अनिवासी भारतीय भारतातील अनेक वस्तूंची व सेवांची खरेदी करतात. त्याचे मूल्य दरवर्षी साधारण एक हजार करोड रुपयांपेक्षा जास्त असते. एनआरआय ची मुख्य गुंतवणूक अथवा खर्च रिअल इस्टेट, ट्रॅव्हल टुरिसम, हॉस्पिटॅलिटी, हेल्थकेअर, रेस्टॉरंट व हॉटेल, फूड, कपडेलत्ते, एजुकेशन, रिटेल सेक्टर, एफएमसीजी, सामाजिक व धार्मिक संस्थांना दान, या प्रमुख सेक्टर मध्ये होते. त्यामुळे या सेक्टर मध्ये कार्यरत सगळ्या कंपन्यांनी, व्यक्तींनी, संस्थांनी मराठी अथवा भारतीय एनआरआय पर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**मासिकाबद्दल थोडक्यात**

विश्व पांथस्थ हे अनिवासी भारतीयांसाठी २०१५ मध्ये सुरु केलेले ठछख रजिस्टर्ड एकमेव मासिक आहे. आजपर्यंत या मासिकाचे छापील अंक युएई, बहरैन, सौदी अरेबिया, कुवैत, ओमान, भूतान, आफ्रिका, युरोप, रशिया, सिंगापूर, बँकॉक, मलेशिया, फार ईस्ट, अमेरिका या अनेक ठिकाणी पोहचले आहे. छापील अंक पाठवण्याचा खर्च जास्त येतो म्हणून डिजिटल स्वरूपात या मासिकाचा डिजिटल अंक सोशल मीडिया मधून अनेक सामाजिक मंडळे, बिझनेस फोरम, अनेक सामाजिक संस्था, हजारो व्यक्तींपर्यन्त पोहचतो. मासिकाची वेबसाईट आहे, एक मोबाईल ऍप आहे, त्याठिकाणी देखील जाहिरात प्रसिद्ध केली जाते. भारतात अनेक राज्यात हे छापील अंक तसेच डिजिटल अंक वितरित केले जातात. यातील असंख्य अंक फ्री दिले जातात. अनेक वाचनालये, अनेक कॉन्फरन्स या ठिकाणी हे अंक वितरित करण्याचा प्रयत्न केला जातो. महाराष्ट्र राज्य सरकारने तसेच माजी मुख्यमंत्री यांनी मासिकासाठी विशेष शुभेच्छा दिल्या आहेत व या उपक्रमाचा गौरव केला आहे.

विश्व पांथस्थ हे केवळ मासिक नाही, हा एक उपक्रम आहे. मासिक हे माध्यम आहे. आपले सहकार्य व सहभाग या उपक्रमाला एक नवीन ऊर्जा देईल. या माध्यमातूम तुमचा व्यवसाय उद्योग भरभराटीला आला तर आम्हाला त्याचा खूप आनंद होईल.

**मासिकासाठी जाहिरातीचे दर (एका जाहिरातीसाठी दर रुपयात, सर्व जाहिराती रंगीत)**

| | |
|---|---|
| कव्हर पेज दोन- रुपये २०,००० | कव्हर पेज तीन - रुपये २०,००० |
| बॅंक पेज . रुपये २५,००० | पूर्ण पान . रुपये १५,००० |
| अर्धे पान . रुपये १०,००० | |

जाहिरात ३० दिवस अगोदर बुक केली व पूर्ण पेमेंट केले तर जाहिरात दरावर २०% वीस टक्के ते ३०% तीस टक्के पर्यंत सूट देण्यात येईल. जाहिरात सॉफ्ट कॉपी हाय रेसोलुशन मध्ये पीडीएफ व सीडीआर फाईल मध्ये द्यावी लागेल.

जाहिरात तयार नसेल तर जाहिरात तयार करण्यासाठी म्हणजे डिसाईन करण्यासाठी देखील मदत करण्यात येईल, डिसाईन चार्जेस वेगळे आकारले जातील. जाहिरातीचे संपूर्ण शुल्क जाहिरात प्रसिद्ध होण्यापूर्वी द्यावे लागेल.

**जाहिरातीसाठी व अधिक माहिती साठी संपर्क**

**ई-मेल-** editor@panthastha.com | मोबाईल व्हाट्सएप - +९१ ९८६०६७८८४४ | www.panthastha.com



**Non Resident Indians (NRIs) have very specific requirements. They spend a lot on buying products and services they need.**

**Do you want to advertise your product, services or projects to NRI market?**

**We will help you reach NRIs**

**For advertisement, write to editor@panthastha.com**

**www.panthastha.com**

विश्व पांथस्थ

अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक VISHWA PANTHASTHA

अनिवासी भारतीयांपर्यंत पोहचण्याचा राजमार्ग

विश्व पांथस्थ

अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक

जाहिरातीकरता संपर्क

editor@panthastha.com


*तुम्ही तेव्हाच स्वतंत्र असता जेव्हा*
*तुम्ही एकाठिकाणी बांधलेले नसता*
*सर्व ठिकाणांचे असता आणि*
*कोणत्याही एका ठिकाणाचे नसता.*
*- माया एंजेलो*



*संकलन - ब्रिजमोहन हेडा*
*San Jose California USA*

आजवरच्या वाटचालीत असंख्य अडचणींना तोंड देऊन
आपण समर्थपणे उभे आहेत.
याबद्दल कौतुक आहेच.
एक सहृदय भारतीय म्हणून आपले योगदान मोलाचे आहे.

आपल्या सर्व इच्छा पूर्ण होवो, त्याकरता शारीरिक,
मानसिक व आत्मिक ऊर्जा आपल्याला मिळावी
हीच परमेश्वर चरणी प्रार्थना !
शुभ दिन !!

विश्व पांथस्थ
अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक VISHWA PANTHASTHA
अनिवासी भारतीयांसाठी

## ----------------------- Start Up - Insights ----------------------

Price Discovery

Most Start Ups and businesses fail because they can not offer products and services to the market at an affordable price. Affordable to both, buyer and seller.
The process of price discovery is a very scientific and gradual process. You and your customer together arrive at a win win price, over a period of time.
You must know which market segment you want to cater to. Wrong market positioning will distort your pricing.
Choose your clients and your market segment carefully. You can not sell bananas in diamond market and also you can not sell a diamond in vegetable market.

## .......... Start Up - Insights ..........

### Proof Of Concept

Start Ups have to demonstrate, not for others only, for themselves first, that their concept can be implemented in real life. This journey from dream to reality is very important. Most start ups do not reach the stage of PoC, because they can not gather resources even for PoC or they have no mental, physical, organisational and professional capability to build PoC. Lot of changes are usually introduced during this journey from Concept to Proof of Concept.
Ideas are plenty. Successful implementation is the key.
Seek help, to convert your ideas into PoC.

## ---------------------- Start Up - Insights ----------------------

Who is a Co Founder

A person, who understands your business, challenges, adds value, shares responsibility of the Founder, enjoys working on the concept passionately, brings another dimension and experience to the table and makes the start up successful. Is a Co Founder.

A person who works with a start up or Founder, who expects to be paid a secured monthly salary, could be a good employee, but not a co founder.

Choose your Co Founder wisely. Co founder is good to have, not must. But you certainly need a good team to sustain and grow a start up.

in3bet
Incubate Partners
Innovate Incubate Invest Build Expand Transform

Mentoring and Incubation Support

www.in3bet.com | mentor@in3bet.com | Mobile - +91 9860678844 (WA)